**PRC/PR/07/2025**

**Transforming Connectivity: Mira Bhayander's Vital Double-Decker Flyover Inaugurated**

**Accelerating Urban Mobility with Faster Connectivity in MBMC**

**Mumbai, 8th March 2025:**

The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has taken a monumental step in revolutionizing urban mobility in Mira Bhayander. Under the visionary leadership of Chief Minister Devendra Fadnavis and the chairmanship of Deputy Chief Minister Eknath Shinde, and spearheaded by Metropolitan Commissioner Dr. Sanjay Mukherjee, IAS, a state-of-the-art double-decker flyover was inaugurated today. This groundbreaking infrastructure will significantly decongest traffic, enhance connectivity, and set new standards in integrated urban transport.

The strategically engineered double-decker flyover, part of Metro Line-9, extends from Sai Baba Nagar Metro Station near S.K. Stone Junction to Shivar Garden. It is built on a shared pier structure, making it a first-of-its-kind transit solution that seamlessly integrates metro and road infrastructure. The inauguration was led by Deputy Chief Minister Eknath Shinde, alongside Transport Minister Pratap Sarnaik and attended by Maha Metro Chairman Rubal Agarwala (IAS) and MBMC Commissioner Radhabinod Sharma.

Key Features of the Double-Decker Flyover

- Total Length: 850 meters
- Shared Metro and Flyover Piers: 21
- Up Ramp Length: 122.6 meters
- Down Ramp Length: 153 meters

Engineering Excellence: A New Era in Infrastructure

This flyover represents next-generation urban transport planning, ensuring both efficiency and safety:

- Common Pier Structure – Built on the same pillars as the Metro Line-9 viaduct, maximizing space and structural efficiency.
- Wider, Safer Lanes – The 17-meter-wide carriageway provides 2+2 lanes for smooth traffic flow.
- Integrated Road Safety Features:
    - RCC anti-crash barriers enhance vehicle safety.
    - Reflective signage, lane markings, and speed limit indicators for seamless navigation.
    - Advanced drainage system to prevent water accumulation.
    - Rumble strips and speed breakers at ramps to regulate vehicle speed.
    - Light poles at 25-meter intervals ensure superior visibility for safer night travel.

Strategic Impact on Traffic and Connectivity

- Bypassing three major traffic bottlenecks—SK Stone Junction, Kanakia Junction, and Shivar Garden Junction—this flyover will drastically cut down travel time and reduce congestion.
- Ensuring smoother transit for a booming urban population, meeting the increasing demand for efficient transport infrastructure.
- Faster commutes and reduced fuel consumption, contributing to a greener, more
- sustainable transport ecosystem.

This flyover is part of MMRDA’s ambitious Metro Line-9 project, connecting Dahisar East to Mira Bhayander. The project includes three flyovers, designed to enhance road connectivity while ensuring seamless metro integration:

- Flyover 1 (Pleasant Park to Silver Park Signal) – Operational since August 2024.
- Flyover 2 (Inaugurated today).
- Flyover 3 (To be completed by August).

Chief Minister Devendra Fadnavis on the Flyover’s Impact:
"is double-decker flyover is a testament to our commitment to building world-class infrastructure that enhances mobility and fosters economic growth. By integrating metro and road transport on the same pillars, we are optimizing space, reducing congestion, and making travel more efficient. The people of Mira Bhayander deserve seamless connectivity, and this project is a significant step towards realizing that vision."

Deputy Chief Minister Eknath Shinde on the Flyover’s Importance:
"This is more than just a flyover; it is a promise delivered. With Mira Bhayander’s rapid urbanization, this double-decker flyover is a crucial step in addressing congestion and enhancing connectivity. Our goal is to make travel easier, safer, and more efficient for every commuter. This project showcases how integrated transport solutions can transform cityscapes."

Metropolitan Commissioner Dr. Sanjay Mukherjee, IAS, on Future-Ready Infrastructure:
"MMRDA is committed to building infrastructure that not only meets today’s needs but is future-ready. This double-decker flyover is a significant achievement, combining efficiency, sustainability, and advanced engineering. With metro operations soon to begin on the second deck, Mira Bhayander will witness a complete transformation in urban transport."

The inauguration of this double-decker flyover marks a pivotal milestone in the city's infrastructural development. It represents progress, innovation, and a better quality of life for millions.

By addressing long-standing traffic challenges and ensuring seamless integration of metro and road transit, this project reaffirms the government’s unwavering commitment to creating world-class urban infrastructure.

As Mira Bhayander moves towards a future of enhanced mobility, reduced congestion, and improved road safety, this landmark project stands as a symbol of development, efficiency, and transformative urban planning.

**वाहतूक जोडणीमधील झेप : मीरा भाईंदरमधील महत्त्वाच्या डबल डेकर उड्डाणपुलाचे उद्घाटन**

**मीरा-भाईंदरमधील वेगवान जोडणीसह शहरी वाहतुकीचा वेग वाढविण्यास चालना**

**मुंबई, ८ मार्च २०२५ :**

मीरा-भाईंदरमधील वाहतूक व्यवस्थेत अमूलाग्र बदल घडविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे (एमएमआरडीए) महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. माननीय मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या द्रष्ट्या नेतृत्वातंर्गत,माननीय उपमुख्यमंत्री व एमएमआरडीएचे अध्यक्ष, श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा. प्र. से., यांच्या मार्गदर्शनाने आज अत्याधुनिक डबल डेकर उड्डाणपुलाचे उद्घाटन करण्यात आले. या अत्याधुनिक पायाभूत सुविधेमुळे वाहतुकीची कोंडी कमी होईल, जोडणीमध्ये सुधारणा होईल आणि शहरी वाहतूक व्यवस्थेत नवे मापदंड प्रस्थापित होतील.

नियोजनबद्धतेने विकसित केलेला हा डबल-डेकर उड्डाणपूल मेट्रो मार्गिका - ९ चा भाग असून एस. के. स्टोन जंक्शनजवळील साईबाबा नगर मेट्रो स्थानकापासून शिवार गार्डनपर्यंत आहे. हा उड्डाणपूल एकाच सामायिक खांबांवर (शेअर्ड पिअर) उभारलेला आहे. या रचनेमध्ये मेट्रो व रस्ते पायाभूत सुविधा अखंडितपणे एकत्र करण्यात आल्या आहेत. माननीय उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते आणि माननीय परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत या उड्डाणपुलाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी महा मुंबई मेट्रोच्या अध्यक्ष रुबल अगरवाल,भा. प्र. से., मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री. राधाबिनोद शर्मा हेही उपस्थित होते.

डबल-डेकर उड्डाणपुलाची महत्त्वाची वैशिष्ट्ये
एकूण लांबी : ८५० मीटर
मेट्रो व उड्डाणपुलाचे सामायिक खांब : २१
चढणीच्या रॅम्पची लांबी : १२२.६ मीटर
उतरंडीच्या रॅम्पची लांबी : १५३ मीटर

अभियांत्रिकीमधील उत्कृष्टता: पायाभूत सुविधांच्या नव्या युगाची सुरुवात
हा उड्डाणपूल नव्या पिढीच्या शहरी परिवहन नियोजनाचे प्रतीक असून, या निमित्ताने कार्यक्षमतेसह सुरक्षिततेचीही खात्री होते.

सामायिक खांबांची संरचना – मेट्रो लाईन-९चे वायाडक्ट ज्या खांबांवर उभारले आहेत त्याच खांबावर ही रचना उभारली आहे. त्यामुळे ज्यामुळे जागेचा आणि संरचनात्मक कार्यक्षमतेचा कमाल वापर सुनिश्चित करण्यात आला आहे.

रुंद आणि सुरक्षित मार्गिका – १७ मीटर रुंद रस्त्यावर २+२ मार्गिका आहेत. त्यामुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर मार्ग उपलब्ध होतो.

- रस्ता सुरक्षेच्या यात समाविष्ट असलेल्या उपाययोजना :
  - वाहने अधिक सुरक्षित व्हावीत यासाठी आरसीसी अँटि-क्रॅश बॅरिअर्स
  - रिफ्लेक्टिव्ह साइन बोर्ड, मार्गिकांच्या पट्ट्या आणि वेगमर्यादा निदर्शकांमुळे वाहतूक मार्गदर्शन सुलभ होते.

o	पावसाच्या पाण्याचा निचरा करणारी यंत्रणा
o	वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी रॅम्पवर रंबल स्ट्रिप्स आणि गतिरोधक बसवण्यात आले आहेत.
o	२५ मीटरच्या अंतराने दिव्याचे खांब बसविण्यात आले आहेत, जेणेकरून रात्रीचा प्रवास सुरक्षितपणे व्हावा यासाठी उत्तम दृश्यमानता राहील.

वाहतुकीवर व जोडणीवर होणारा परिणाम
एस. के. स्टोन जंक्शन, कनाकिया जंक्शन आणि शिवार गार्डन जंक्शन ही वाहतूक कोंडी होणारी तीन प्रमुख ठिकाणी टाळता आल्याने या उड्डाणपुलामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल आणि वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.
वाढत्या शहरी लोकसंख्येला सोयीस्कर प्रवासाची सुविधा मिळण्याची खात्री झाली आहे आणि सक्षम परिवहन पायाभूत सुविधेची मागणी पूर्ण झाली आहे.
वाहतूक वेगवान झाल्यामुळे इंधनाचा वापर कमी झाला आहे. त्यामुळे हरित व पर्यावरणस्नेही परिवहन परिसंस्थेत योगदान देण्यात आले आहे.

हा उड्डाणपूल एमएमआरडीएच्या महत्त्वाकांक्षी मेट्रो लाईन-९ प्रकल्पाचा एक भाग असून, तो दहिसर पूर्व ते मीरा-भाईंदर यांना जोडतो. या प्रकल्पांतर्गत तीन उड्डाणपुलांचा समावेश असून रस्ते जोडणी सुधारण्यासोबतच मेट्रोशी सुलभपणे जोडणी करण्यासाठी हे नियोजन करण्यात आले आहे.

उड्डाणपूल १ (प्लेझंट पार्क ते सिल्व्हर पार्क सिग्नल) - ऑगस्ट, २०२४मध्ये वाहतुकीसाठी खुला झाला.
उड्डाणपूल २ (आज उद्घाटन झाले)
उड्डाणपूल ३ (ऑगस्टपर्यंत पूर्ण होईल).

या उड्डाणपुलाच्या संभाव्य परिणामाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले : "हा डबल-डेकर उड्डाणपूल म्हणजे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्मितीसाठी असलेल्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. या उड्डाणपुलामुळे वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होईल आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल. मेट्रो आणि रस्ते वाहतूक सामायिक खांबांवर उभारल्यामुळे जागेचा सुयोग्य वापर होत आहे, वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाली आहे आणि प्रवास अधिक सोयीस्कर झाला आहे. मीरा-भाईंदरच्या रहिवाशांना अखंड आणि सुरळीत प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी हा प्रकल्प एक महत्त्वाचे पाऊल ठरेल."

या उड्डाणपुलाचे महत्त्व विशद करताना उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष श्री. एकनाथ शिंदे म्हणाले : "हा केवळ एक उड्डाणपूल नाही तर आम्ही केलेली वचनपूर्ती आहे. मीरा-भाईंदरच्या झपाट्याने होणाऱ्या विकासामुळे वाहतूक कोंडी वाढत असून, त्यावर तोडगा काढण्यासाठी हा डबल-डेकर उड्डाणपूल हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याचा आमचा उद्देश आहे. समन्वयित वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून शहराचा चेहरामोहरा कसा बदलू शकतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

या भविष्य-सज्ज पायाभूत सुविधेवर प्रतिक्रिया देताना महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, भा. प्र. से. म्हणाले : "एमएमआरडीएतर्फे केवळ आजच्या गरजा पूर्ण करणाऱ्या नव्हे, तर भविष्यातही उपयोगी ठरणाऱ्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात येते. कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि आधुनिक अभियांत्रिकी यांचा मिलाफ साधणारा हा डबल-डेकर उड्डाणपूल म्हणजे एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. लवकरच दुसऱ्या स्तरावर मेट्रो सेवा सुरू होत असल्याने मीरा-भाईंदरच्या शहरी वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल अनुभवायला मिळणार आहे."

या डबल-डेकर उड्डाणपुलाच्या उद्घाटनामुळे शहराच्या पायाभूत विकासातील महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. हा प्रकल्प प्रगती, नवकल्पना आणि लाखो नागरिकांच्या उत्तम जीवनमानाचे प्रतीक आहे.

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वाहतूक समस्या सोडवून आणि मेट्रो व रस्ते वाहतुकीचे अखंड एकात्मीकरण सुनिश्चित करून, या प्रकल्पाच्या माध्यमातून जागतिक दर्जाच्या शहरी पायाभूत सुविधांच्या निर्मितीबाबत सरकारची ठाम बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

मीरा-भाईंदरमधील वाहतूक सुटसुटीत होत असताना, वाहतुकीची कोंडी कमी होत असताना आणि रस्ते सुरक्षेत सुधारणा होत असताना हा महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणजे विकास, कार्यक्षमता आणि आधुनिक शहरी नियोजनाचे प्रतीक ठरला आहे.






CANTON HOUSE





